महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ दूरध्वनी २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai ४००००१ दूरध्वनी २२६७ ०२१० /१४८ /२४८, २२१०२२२२ Fax : २२६७३९१५

माझगांव कार्यालय

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ दूरध्वनी २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.९१५, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai ४००२०३ Tel.२३७४२१९१ Fax : २३७८१०६१

ई-मेल **sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com** वेबसाईट **www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**

# लिपिक-टंकलेखक ( मराठी व इंग्रजी ) परीक्षा - २०११

## क्रमांक १४४२ / २०११ / तीन

## जाहिरात क्रमांक : १६२/२०११

**मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील लिपिक-टंकलेखक (मराठी ) व लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) या गट-क संवर्गातील पदावरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे रविवार, दिनांक १८ डिसेंबर, २०११ रोजी लिपिक-टंकलेखक (मराठी व इंग्रजी) परीक्षा-२०११** महाराष्ट्रातील सर्व **३५ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **पदाचे नाव व एकूण पदसंख्या** | **अराखीव** | **अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित** | **अनुसूचित जमाती** | **वि. जा. (अ)** | **भ. ज. (ब)** | **वि.मा.प्र.** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ. मा. व.** |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **१** | **लिपिक-टंकलेखक (मराठी) (एकूण पदे १६५६)** | ७७३ | १८३ +१३* | १२३ +३७* | ४९ +१६* | ४० +१* | ३३ +६* | ४७ +१७* | ३२ +७* | २६३ +१६* |
| | **महिला -** | २३२ | ५९ | ४८ | १९ | १३ | ११ | २० | ११ | ८४ |
| | **माजी सैनिक -** | ११६ | ३० | २४ | १० | ६ | ६ | ९ | ५ | ४२ |
| | **खेळाडू -** | ३८ | १० | ७ | ४ | २ | २ | ३ | ३ | १४ |
| | **अपंग-** | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - २३, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु-१८, श्रवण शक्तीतील दोष- १९ | | | | | | | | |
| **२** | **लिपिक-टंकलेखक (इंग्रजी ) (एकूण पदे-१०३)** | ३९ | ७ | २ +१२* | ३ +५* | ४ | १ | ४ +३* | ४ +३* | १४ +२* |
| | **महिला-** | १२ | २ | ४ | २ | २ | -- | २ | २ | ५ |
| | **माजी सैनिक-** | ६ | १ | २ | १ | १ | -- | १ | १ | ३ |
| | **खेळाडू-** | ३ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | **अपंग-** | अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - ५, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु-२, श्रवण शक्तीतील दोष- ६ | | | | | | | | |

२.१ * ही पदे अनुशेषाची आहेत.

२.२ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.३ महिला, माजी सैनिक व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.४ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.५ अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.६ अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर स्पर्धा परीक्षेद्वारे शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

२.७ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे.

२.८ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३. **वेतनश्रेणी** :- रु. ५,२००-२०,२००(ग्रेड पे- १,९००) अधिक भत्ते एकूण वित्तलब्धी अंदाजे रु. १३,६७३/-

४.**पात्रतेच्या अटी** :-

४.१ भारतीय नागरिक.

४.२ **वयोमर्यादा** - १ मार्च, २०१२ रोजी किमान १८ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा (मागासवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा) जास्त नसावे.

४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता ५ वर्षांपर्यंत.

४.३.२ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.३ माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा प्रचलित नियमानुसार

४.३.४ अपंग उमेदवारांसाठी ४५ वर्षांपर्यंत.

४.४ **शैक्षणिक अर्हता** :-

४.४.१ माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (S.S.C.) उत्तीर्ण अथवा तत्सम अर्हता.

४.४.२ लिपिक-टंकलेखक (मराठी) पदासाठी मराठी टंकलेखनाचा वेग ३० शब्द प्रति मिनिट व लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) पदासाठी- इंग्रजी टंकलेखनाचा वेग ४० शब्द प्रतिमिनिट. सदर वेगाबाबत शासकीय परीक्षा मंडळाची परीक्षा अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास म्हणजेच **दिनांक २४ नोव्हेंबर, २०११** रोजी किंवा तत्पूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक.

४.४.३ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

४.४.४ लिपिक-टंकलेखक (इंग्रजी) या पदावर नियुक्त होणा-या उमेदवारांना मनासे (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परीक्षा सक्तीची करण्याबाबत) नियमावली १९९१ मधील नियम ३ व ४ नुसार, एतदर्थ मंडळाची मराठी टंकलेखनाची प्रति मिनिट ३० शब्द गतीची परीक्षा, शासन सेवेत प्रविष्ठ झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना " तसेच " परीक्षा " या विभागातील "लिपिक-टंकलेखक परीक्षा" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे.

६. शुल्क :

६.१ अमागास - रु.२६०/-

६.२ मागासवर्गीय - रु.१३५/-

६.३ माजी सैनिक - रु. १०/-

६.४ सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरीत्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

७. **अर्ज करण्याची पद्धत** :-

७.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

७.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ४ नोव्हेंबर, २०११ ते २४ नोव्हेंबर, २०११** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

७.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

७.४ विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्णकार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

७.५ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वतःचा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व स्वतःचा फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

७.६ बॅकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा.

७.७ Transaction ID ची नोंद अचूकपणे केल्यानंतर व नोंदविलेला Trasaction ID वैध असल्यास उमेदवाराला संबंधित जिल्हाकेंद्रावरील आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

७.८ प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर एक सप्ताहामध्ये उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्राची प्रत त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने डाऊनलोड करुन घेणे आवश्यक आहे.

७.९ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

८. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी **चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २४ नोव्हेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे**. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. **चलनाद्वारे विहित शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २५ नोव्हेंबर, २०११ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.**

९. चलनाद्वारे शुल्क बँकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त होणारा **Transaction ID दिनांक २७ नोव्हेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे**. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१०. आयोगाने विहित केलेल्या पद्धतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पद्धतीने व विहित कालावधीत न करणाऱ्या उमेदवाराचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

मुंबई :
दिनांक : **४ नोव्हेंबर, २०११**

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग